कार्यालय शिक्षण विभाग(प्राथ.)प.स.भातकुली परीसर,जिल्हापरिषद,अमरावती
EmailD-eozpamravati@gmail.com Office Phone No.- 0721-2970206

जा.क्र./जिपअ /शिक्षण/ आस्था/डी-२/८९८२/२०२५ दिनांक :- ०६/११/२०२५

प्रति,

१. अनुसुचित जमातीचे उमदवार (पेसा क्षेत्र)
२. पेसा क्षेत्रातील इतर प्रवर्ग उमेदवार
३. सर्वसाधारण क्षेत्रातील उमेदवार
(सोबत जोडलेल्या यादितील पात्र उमेदवार एकूण १८३ )

विषय:- दिनांक ०७/११/२०२५ रोजी समुपदेशन प्रक्रिये करीता उपस्थित राहणेबाबत.

संदर्भ:- १. मा. कक्ष अधिकारी शालेय शिक्षण व क्रिडा यांचे पत्र क्रमांक संकीर्ण २०२४/प्र.क्र.४१४/टिएनटि-१ दि. १५/०७/२०२४
२.मा.आयुक्त (शिक्षण )आयुक्तालय पुणे यांचे पत्र जा.क्र. आस्था-क/प्राथ१०६/शा.प.-पेसा कं. पद/२०२४/४४८१दि.१९/०७/२०२४
३. जिल्हा परिषदेच्या संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द दिनांक २३/०९/२०२५ ते २७/०९/२०२५
४. कार्यालयीन पत्र जा.क्र./जिप अ /शिक्षण /आस्था/डी-२/८४२८/२०२५ दिनांक १७/१०/२०२५
( जिल्हा परिषदेच्या संकेत स्थळावर पात्र/अपात्र उमेदवार यादी प्रसिध्द)

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये पेसा क्षेत्रातील रिक्तपदावर कंत्राटी पध्दतीने पदस्थापना करावयाची असल्याने सोबत जोडलेल्या यादितील पेसा क्षेत्रातील अनुसुचित जमाती, पेसा क्षेत्रातील इतर प्रवर्ग व सर्वसाधारण क्षेत्रातील पात्र उमेदवारांनी खालील नमुद ठिकाणी समुपदेशन प्रक्रीये करीता उपस्थित राहावे. गैरहजर राहिल्यास एकतर्फी निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तसेच सदरची यादी जिल्हा परिषदेच्या https://zpamravati.gov.in/ www.zpamravati.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

| अ.क्र. | दिनांक | यादितील अ.क्र. | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|---|
| १ | दि. ०७/११/२०२५ | सोबत जोडलेल्या यादीतील पात्र उमेदवार अ.क्र. १ ते १८३ | सकाळी १०.०० | डॉ. पंजाबराव देशमुख सभागृह जिल्हा परिषद अमरावती |

( टिप:- निवड झाल्यावर करार नामा, १०० रुपयाच्या स्टॅप पेपरवर सादर करावा.)

सहपत्र :- १. पात्र उमेदवार यादी अ.क्र. १ ते १८३
२.साक्षांकन नमुना
३. करार नामा नुमुना
४. लहान कुटुंब नमुना

(सतीश मुगल )
शिक्षणाधिकारी(प्राथ.)
जिल्हापरिषद अमरावती

प्रतिलिपी:- १ मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, अमरावती यांना माहितीस्तव सविनय सादर.
२ कक्ष अधिकारी शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक मंत्रालय मुंबई-४०००३२ यांना माहिती करीता.
३. गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती सर्व यांनी उपरोक्त समुपदेशन प्रक्रीये बाबत सोबत जोडलेल्या यादीतील उमेदवारांना आपल्या स्तरावरून सर्व माध्यमातून कळविण्यात यावे.
४. गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती धारणी व चिखलदरा यांनी उक्त रोजी समुपदेशन प्रक्रीये करीता रिक्त पदाच्या अहवालासह उपस्थित राहावे.

शिक्षणाधिकारी(प्राथ.)
जिल्हापरिषद अमरावती

Scanned with OKEN Scanner

# प्रतिज्ञापन

## नमुना- अ

(नियम ४ पहा)

मी, श्री / श्रीमती / कुमारी------------------------------------------------------------

श्री ------------------------------------------------------------यांचा / यांची / मुलगा / मुलगी / पत्नी,

वय---------------- वर्षे, राहणार------------------------------------------------------------

याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

१. मी------------------------------------ ---------या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२. आज रोजी मला-------------------(संख्या) इतकी हया मुले आहेत. त्यापैकी दि.------------------ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या-------------- आहे. (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा.)

३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक------------------------ नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र राहील याची मला जाणीव आहे.

ठिकाण:

दिनांक: (सही)

Scanned with OKEN Scanner

# साक्षांकन नमुना / Attestion Form

| | | |
|---|---|---|
| १ | उमेदवारांचे पूर्ण नांव (नांवात किंवा अडनावात बदल झाले असल्यास तसे नमुद करावे) | |
| २ | सध्याचा संपूर्ण पता (गाव,तालुका,जिल्हा,गल्ली,मार्ग रस्ता आणि शहर) | |
| ३ | घराचा पूर्ण पत्ता (गाव,तालुका,जिल्हा,गल्ली,मार्ग रस्ता आणि शहर) | |
| ४ | आधार कार्ड क्रमांक | |
| ५ | पॅन कार्ड क्रमांक | |
| ६ | राष्ट्रीयत्व | |
| ७ | जन्म दिनांक | |
| ८ | सध्याचे वय | |
| ९ | मॅट्रीक (दहावी) मध्ये असतांनाचे वर्ष | |
| १० | आई-वडील/ पती-पत्नी यांचा मुळ जिल्हा व राज्य | |
| ११ | धर्म | |
| १२ | जात (प्रवर्ग) | |

**मागील ५ वर्षात एकावेळी एका वर्षाहून अधिक काळापर्यंत ज्या ठिकाणी राहीला असाल त्या ठिकाणाचा तपशिल**

| अ क्र | पासुन | पर्यंत | गाव/शहर घर क्र/रस्ता/गल्ली/मार्ग | तालुका | जिल्हा | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |
| ५ | | | | | | |

**वयाचे २१ वर्ष पूर्ण झाल्यावर एका वर्षाहून अधिक काळापर्यंत ज्या ठिकाणी राहीला असाल त्या ठिकाणाचा तपशिल**

| अ क्र | पासुन | पर्यंत | गाव/शहर घर क्र/रस्ता/गल्ली/मार्ग | तालुका | जिल्हा | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |
| ५ | | | | | | |

Scanned with OKEN Scanner

## कुटूंबाची माहीती दर्शविणारा तक्ता

| नाते | पूर्ण नांव आणि टोपण नांव असल्यास त्यासह | राष्ट्रीयत्व (जन्माने किंवा अधिवासाने) | जन्मस्थान | व्यवसाय,नोकरी करित असल्यास त्याचे पदनाम व कार्यालयाचा पत्ता | सध्याचा पत्रव्यवहाराचा पत्ता (मागील पत्ता बदलेला असल्यास) | कायमचा निवासाचा पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|
| वडील | | | | | | |
| आई | | | | | | |
| भाऊ/बहीण | | | | | | |
| पती/पत्नी | | | | | | |

### मुलगा / मुलगी बाहेर देशात शिक्षणाकरिता अथवा राहण्यास गेले असल्यास त्या बाबतची माहीती

| नाव | राष्ट्रीयत्व (जन्माने किंवा अधिवासाने) | जन्मस्थान | अध्ययनासाठी / निवासासाठी ज्या देशात गेला/ गेली आहे तेथील पुर्ण पत्ता | परदेशात केव्हा पासुन शिक्षण घेत आहेत/ राहत आहेत. |
|---|---|---|---|---|
| | | | | |

### पंधराव्या वर्षापासुन शालेय आणि महाविद्यालयीन शैक्षणीक अर्हतेबाबतची माहीती

| शैक्षणीक अर्हता | शाळा / महाविद्यालयाचे नांव (पूर्ण पत्तयासह) | शाळा सोडल्याचा दिनांक | परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|
| एस.एस.सी | | | | |
| एच.एस.सी | | | | |
| पदविका/------------ | | | | |
| पदवि ------------- | | | | |
| पदयुत्तर पदवि-------- | | | | |
| इतर -------------- | | | | |

**केंद्र किंवा राज्य शासन किंवा निमशासकीय किंवा शासनवत नियम किंवा स्वायत्त संस्था किंवा सार्वजनीकक्षेत्र उपक्रम किंवा खाजगी संस्था किंवा सस्था या अंतर्गत पद धारण केले आहे काय ? किंवा कोणत्याही वेळी नियुक्ती करण्यात आली आहे काय ? तसे असल्यास नियुक्तीच्या दिनांकासह संपूर्ण माहीती खाली रकान्यात दयावी.**

| कालावधी | | धारण केलेले पद (सेवायोजनाची वित्तलबधी व स्वरुप) | नियोक्त्याचे पुर्ण नाव व पत्ता | नियोक्त्याचे पुर्ण नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| पासुन | पर्यंत | | | |
| | | | | |

Scanned with OKEN Scanner

**खालील रकान्यात होय किंवा नाही स्पष्ट नमुद करावे, काहीही नमुद न केल्यास होय असे समजुन नियुक्ती आदेश निर्गमीत करण्यात येणार नाही.**

| | | |
|---|---|---|
| १ | तुम्हाला आतापर्यंत कधीही स्थानबध्द ठेवले होते काय? | |
| २ | तुम्हाला आतापर्यंत कधीही अटक करण्यात आले होते का;? | |
| ३ | तुमच्या विरुध्द खटला दाखल करण्यात आलेला आहे काय (म्हणजे कोणत्याही न्यायालयात तुमच्या विरुध्द फौजदारी खटल्या बाबत दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते काय? | |
| ४ | हा साक्षांकन नमुना भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात आपल्या विरुध्द फोजदारी खटला प्रकरण प्रलबिंत आहे का? | |
| ५ | तुम्हाला न्यायालयाकडून कोणत्याही अपराधा बध्दल आता पर्यंत सिध्द अपराधी ठरविण्यात आले आहे का? | |
| ६ | कोणत्याही शासन किंवा अन्य याअंतर्गत कोणतेही प्रशिक्षण /संस्था यांनी कार्यमुक्त केले/काढून टाकले/काढले आहे काय? | |
| ७ | तुम्हाला कोणत्याही विद्यापीठ /कोणतेही इतर शैक्षणीक प्राधिकरण/ संस्था यांनी काढून टाकले आहे काय? | |
| ८ | तुम्हाला कोणत्याही लोकसेवा आयोग /कर्मचारी निवड आयोग यांनी त्यांच्या कोणत्याही परिक्षा / निवडीसाठी कधी प्रतिरोधीत / अनर्ह ठरविले आहे काय ? | |

**निवासी भागातील दोन जबाबदार व्यक्तींची नावे किंवा तुम्हाला ओळखणा-या दोन संदर्भी व्यक्तींची नांवे**

१------------------------------------------------------------

२------------------------------------------------------------

**टिप :-**

१) या साक्षांकन नमुन्यामध्ये खोटी माहीती दिल्यास किंवा कोणतीही वस्तुथितीदर्शक माहीती दडवून ठेवल्यास त्याला अपात्र ठरविण्यात येईल,आणि कोणत्याही राज्य शासकीय सेवे साठी कायम अपात्र ठरेल.

२) हा नमुना भरुन सादर केल्यानंतर ,जर उमेदवाराला स्थानबध्द केले,अटक करण्यात आले,खटला चालविण्यात आला,हद्यपार करण्यात आले,दंडासाठी सिध्दपराध ठरला,मनाई केली दोषमुक्त इत्यादी.केले तर हा तपशील ज्यांना साक्षांकन नमुना अलिकडेच पाठविण्यात आला होता त्या प्राधिका-याला तात्काळ कळविला पाहीजे असे करण्यास कसुर केल्यास वस्तुस्थितीनिदर्शक माहीती दडवून ठेवल्याचे समजण्यात येईल.

३) कोणत्याही व्यक्तीने सेवेमध्ये असतांना साक्षांकन नमुन्यात खोटी माहीती सादर केली किंवा वास्तविक माहीती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आले तर ती व्यक्ती, तिची सेवा समाप्त करण्यास पात्र ठरेल.

## शपथपत्र

**मी असे प्रमाणित करतो/करते की, माझी पूर्वगामी दिलेली माहीती ही अचुक आणि माझ्या संपूर्ण माहीती प्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरी आहे.मी पूर्णपणे जाणीवपूर्वक सांगतो/सांगते की, हा नमुना भरतांना खोटी माहीती पुरविली किंवा महत्वाची माहीती दडवून ठेवली तर या प्राधिकरणाला माझे नियुक्तीपत्र रद्य करण्याचा पूर्ण अधिकार,आणि त्याचा परिणाम म्हणुन मी देखील फौजदारी / नागरी /वैध कारवाईस पात्र आहे.शासना अंतर्गत नियुक्ती होण्यासाठी माझ्या पात्रतेला हानी पोहेचेल अशा परिस्थितीची मला जाणीव नाही.**

**उमेदवाराची सही**------------------------

**नांव:**-------------------------------------

**दिनांक :**----------------------------------

**ठिकाण :**---------------------------------

Scanned with OKEN Scanner

## DECELARATION

I certify that the foregoing information is correct and complete to the best of mya knowledge and belief , I am fully aware that by providing false information of suppressing material information while filling this foem, the authorities have full right to terminate my appointment letter and I am also liable for appropriate criminal/civil/legal action sa a consequence.

I am not aware of my circumstances which might impair my fitness for employment under Government.

Signature Of the Candidate---------

Name :------------------------------------

Date :--------------------------------------

Place :------------------------------------

Scanned with OKEN Scanner

**पेसा क्षेत्र कंत्राटी शिक्षक पदभरती २०२५**

**सेवा करारनामा**

आज दिनांक.    /    /२०२५ रोजी खालील प्रमाणे करार करण्यात येत आहे

**मा. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),**
**जिल्हा परिषद अमरावती**

**या करारासाठी पक्ष क्रमांक १**

करार पेसा क्षेत्रातील भरती प्रक्रियेकरिता अनुसूचित जमाती व इतर प्रवर्गातील शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता धारण करणाऱ्या उमेदवाराचे नाव श्रीश्रीम / .ती.............................................................. .वय...................वर्ष

पत्ता..........................................................................................................................

**या करारासाठी पक्ष क्रमांक २**

सदर सेवा कराराचे नियमन करणाऱ्या **अटी/शर्ती** खालीलप्रमाणे असतील.

१. करार कंत्राटी उमेदवाराचे नाव ..........................................................................पक्ष क्र.२ यांची नियुक्ती नियमित शिक्षक उपलब्ध होईपर्यंत असेल. त्यानुसार त्यांचा कामाचा कालावधी असेल अथवा शासन / मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडून निर्गमित होणाऱ्या सूचनांच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

२. सहायक शिक्षक / पदवीधर शिक्षक म्हणून असणारी विहित कामे करणे हे पक्ष क्र.२ ला बंधनकारक राहतील.

३. सदर कामासाठी पक्ष क्र.१ हे पक्ष क्र.२ यांना प्रतिमास रु.२०,०००/- (वीस हजार मात्र) इतके मानधन शासन स्तरावरुन अनुदान उपलब्ध् झाल्यावर अदा करेल व सदर सेवा कराराचे कालावधीत मानधनात बदल होणार नाही.

४. सदर सेवा करार पक्ष क्र.२ एक महिन्याच्या पूर्व सूचनेने समाप्त करता येईल. एक महिन्याची पूर्व सूचना न दिल्यास एक महिन्याचा पगार जमा करावा लागेल हि अट पक्ष क्र. २ ला मान्य आहे.

५. पक्ष क्र. २ हे पक्ष क्र. १ यांचे कार्यालयात प्राधिकृत केलेले अधिकारी यांचे नियंत्रणाखाली स्वतःच्या जबाबदारीवर काम करेल व कराराचे कालावधीत कोणत्याही तऱ्हेच्या अनपेक्षित कारणामुळे अथवा झालेल्या अपघातामुळे त्यास कोणत्याही प्रकारची शारीरिक व मानसीक इजा झाल्यास त्यासाठी पक्ष क्र. १ कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही.

६. पक्ष क्र. २ कार्यालयामध्ये काम करण्यासाठी वक्तशीरपणे नियमित उपस्थित राहील व दैनिक टाचण काढुन अध्यापन कार्य करेल. तसेच पक्ष क्र. २ ची कार्यालयातील वर्तणूक व कामाची गुणवत्ता उच्च दर्जाची राहील व त्याचे उत्तरदायित्व पक्ष क्र. १ च्या सर्व हितसंबंधाची रक्षा करणेचे राहील.

७. पक्ष क्र. १ यांनी वेळोवेळी निर्गमित केलेले नियम व सूचना पक्ष क्र. २ यास बंधनकारक राहतील व त्याच प्रमाणे विहित केलेल्या गुणवत्तेनुसार पक्ष क्र. २ कडून काम न झाल्यास पक्ष क्र. १ चे निर्देशनास आल्यास सदर सेवा करार तात्काळ रद्द करण्याचे अधिकार पक्ष क्र. १ कडे राहतील .

८. पक्ष क्र. २ या सेवा कराराचे कालावधीत अन्ये ठिकाणी कोणतेही काम स्वीकारण्यास मनाई राहील.

९. पक्ष क्र. २ यांच्यावर कोणत्याही प्रकारचा गुन्हा व आरोपपत्र नसल्याचे प्रमाणपत्र स्वतंत्र सादर करावे लागेल.

१०. या सेवा करारपत्रचे कोणत्याही कलमाबाबत वा अन्य कोणत्याही नियमाबाबत विवाद निर्माण झाल्यास पक्ष क्र. १ चा निर्णय अंतिम राहील व त्याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार / सूचनेची दखल घेतली जाणार नाही.

११. पक्ष क्र. २ यांची नियुक्ती हि तात्पुरत्या स्वरुपाची असल्यास भविष्यात पूनर्नियुक्ती अथवा पदस्थापना कामी किंवा वरिष्ठ प्राधिकरणाकडे तसेच न्यायालयाकडे दाद मागण्याचा अधिकार पक्ष क्र. २ यास राहणार नाही.

१२. पक्ष क्र. २ यांना जिल्हा परिषद यंत्रणेकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचना व आदेश बंधनकारक राहतील.

१३. उमेदवार हे वैद्यकीय दृष्ट्या सेवा करण्यास सक्षम असल्याचे जिल्हा शल्य चिकीत्सक यांचे प्रमाणपत्र सादर करणे पक्ष क्र. २ यांना बंधनकारक राहील. सदरचे प्रमाणपत्र नियुक्ती पासुन ७ दिवसाच्या आत सादर न केल्यास पक्ष क्र. २ यांची नियुक्ती रद्य होईल.

१४. वरील प्रमाणे करण्यात आलेली नियुक्ती नियमीत शिक्षक उपलब्ध होईपर्यंत अथवा करारनाम्यातील मुदत (एप्रिल 2026) यापैकी जी बाब प्रथम येईल त्या कालावधी पर्यंत लागू राहील.

१५. पक्ष क्र. २ यांनी १ ते १४ पैकी कोणत्याही अटी / शर्तीचा भंग केल्यास कोणताही पूर्वसूचना न देता आदेश रद्द करण्याचे अधिकार पक्ष क्र. १ यांना राहतील.

दिनांक:-                    स्वाक्षरी

**(नाव-------------------------------------------)**

**पक्ष क्र. २**

दिनांक :                    स्वाक्षरी

**(नाव-------------------------------------------)**

**पक्ष क्र. १**

साक्षीदार

१) ..................................................................

२) ..................................................................

Scanned with OKEN Scanner